**नियमित फौजदारी केस नं. ५०/२०१७**
**नि. क्र. ४२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – दिपक कृष्णा झिमन,

**वय**– ३३ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी नोकरी,

**राहणार** — टिटवाळा, मुंबई.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून –**

**०१**. मी सोमा रत्नू कानसे यांना ओळखतो. माझी आर्थीक परीस्थीती गरीब असल्यामुळे माझे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण सोमा कानसे यांनीच केले. फिर्यादी विनायक कानसे हा सोमा रत्नू कानसे यांचा पुतण्या आहे. विनायक हा मला माझ्या सख्या भावासारखा आहे.

**०२**. जुलै – २०१४ या महिन्यात मी मुंबई येथे होतो. त्या दरम्यान विनायक कानसे याने मला फोन करुन सांगितले की, आनंद वेंगुर्लेकर हे आपल्याला महसूल विभागात शिपाई म्हणून नोकरीस लावणार आहेत. दिनांक २५/१०/२०१४ रोजी फिर्यादी विनायक याने मला कॉल केला की, नोकरीच्या कामासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड अशी माझी कागदपत्रे लागतील. मी ते कागद मुंबईहून घेवून गावी आलो. 'गावी' म्हणजे कळंबस्ते मधलीवाडी येथे आलो. ते माझे व विनायकचे मूळ गाव आहे. विनायक गावीच होता. मी दिनांक २५/१०/२०१४ रोजी सकाळीच गावी पोहोचलो होतो. मला विनायक याचा फोन २४ तारखेला रात्री आला होता. २५ तारखेला घरी पोहचल्यावर मी फ्रेश होवून, मी, विनायक व काका सोमा असे आम्ही तिघे फणसवणे येथील रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक या बँकेत गेलो. त्या बँकेत सोमा रत्नू कानसे यांनी त्यांचे ब्रासलेट, अंगठी व इतर दागिने गहाण ठेवून रुपये १,२१,०००/– इतकी कॅश बँकेतून घेतली. ती रक्कम घेवून आम्ही तिघे रत्नागिरी येथे आनंद वेंगुर्लेकर यांच्या घरी पोहोचलो. आम्ही आनंद याच्या घरी ती रक्कम आनंद याच्या घरी हाती दिली. त्यावर आनंद वेंगुर्लेकर यांनी

काका सोमा रत्नू कानसे यांना तेथेच थांबविले व मला तसेच विनायकला स्कूटीवरुन त्यांनी कलेक्टर ऑफीसमध्ये नेले. तेथे वेंगुर्लेकर यांनी मी व विनायकच्या नावे १००/- रुपये दराचे ०४ स्टँप पेपर घेतले. त्यातील ०२ स्टँप पेपर माझ्या नावे व ०२ विनायक याच्या नावे घेतले होते. तसेच त्याने त्या कोऱ्या स्टँप पेपरवर आमच्या सहयाही घेतल्या. आम्ही ते पेपर कोरे असल्याबाबत विचारले असता त्यांनी ''लवकर-लवकर सहया करा तुमचे काम होत आहे'' असे सांगितले. आनंद वेंगुर्लेकर हे स्टँप पेपर घेवून पुढे गेले व आम्हाला तेथेच थांबायला सांगितले. आम्ही तेथे एकूण अर्धा ते एक तास थांबलो. असे त्याने आम्हाला तेथे सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत थांबविले. आम्ही स्टँप सकाळी ११:०० वाजे नंतर घेतले होते, परंतू ती निश्चीत वेळ मला सांगता येत नाही. त्यानंतर आनंद वेंगुर्लेकर यांनी मला सांगितले की, ''तु मुंबईला परत जा, तुझी ऑर्डर आली की मी तुला कॉल करतो त्यावेळी ये''. त्यावर मी मुंबईसाठी निघून गेलो.

**०३.** मी दर तीन-चार दिवसांनी आनंद वेंगुर्लेकर यांना विचारत होतो. ते कॉल उचलत नसत, टाळा-टाळी करीत असत. मी फिर्यादी विनायक याला सांगितले की, आनंद वेंगुर्लेकर कॉल उचलत नाहीत. त्यानंतर पुढे फिर्यादी विनायक यांनी केस केली. आनंद वेंगुर्लेकर हे आम्हाला ''काम करुन देतो'' असे बोलले होते परंतू त्यांनी काम केले नाही, त्यामुळे केस केली. विनायक याने आनंद वेंगुर्लेकर यांना पैसे दिले होते. विनायक याने १५,६७,०००/- रुपये दिले होते.

**०४.** आज आरोपी आनंद वेंगुर्लेकर न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास - आरोपी याने साक्षीदाराचा उलटतपास करण्यास असमर्थता दर्शविली. आरोपीचे विधीज्ञ गैरहजर आहेत. निशाणी ४१ लगत या न्यायालयाने केलेल्या आदेशाप्रमाणे कॉस्टची रक्कम आरोपीने दिलेली नाही. सबब, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३०९ चे पोट कलम २ मधील तिसऱ्या</u>**

**<u>स्पष्टीकरण्याच्या चौथ्या परंतुकेनुसार 'आरोपीकडून वा आरोपीतर्फे उलटतपास नाही'</u>**

**<u>असा आदेश करण्यात आला. सबब, उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.11.14 18:11:01 +0530

(ब. द. तारे)

**दिनांक १४/११/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख**

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in R.C.C. No. 50/2017

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 14/11/2024 |
| evidence signed by PO. on | :- | 14/11/2024 |
| evidence uploaded on | :- | 14/11/2024 |